# DEPARTMENT OF

# FAMILY RESOURCES AND MANAGEMENT

PHOTO GALLARY

**2019-2020**

,

## तबांखू मुक्त दिवस




लोकमत

**एस. चंद्रा महाविद्यालय**

आमगाव : येथील एस.चंद्रा महिला महाविद्यालयात राष्ट्रीय तंबाखू मुक्त दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तृष्णा कडबे यांनी, खर्रा, गुटखा, पान खाल्याने शरीरावर होणारे वाईट परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. प्रा.देवानंद खोब्रागडे यांनी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ दिली.तंबाखू मुक्ती या विषयावर मुलींनी आपले मत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी प्रा.भावना खापर्डे, प्रा.प्रमोद सरदार, प्रा.स्वप्नील भगत, प्रा दिक्षा बडोले तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले

Hello Gondia
Page No. 4 Jul 31, 2019
Powered by: erelego.com



the Programme Dr Shyam Dafare, other faculty members and senior students worked for the success of the programme. Dr Veena Mahajan conducted the proceedings. Teaching and non-teaching staff storve hard for success of the programme.

**Chandra Mahila Mahavidyalaya, Amgaon**

Students being administered oath in the college.

S CHANDRA Mahila Mahavidyalaya, Amgaon, observed World No-Tobacco Day. Students took an oath to refrain from using all kind of tobacco consumption. Assistant Professor Devanand Khobragade administered the oath under the guidance of Dr Trushna Kalambe, Principal of the College. Dr Sardar, Assistant Professors Gajbhiye, Khaparde, Khobragade, Bhagat and Badole were prominently present on the occasion. Teaching and non-teaching staff were also present on the ocacsion.

# पुरग्रस्तांना मदत




# मतिमंद मुलांची भेट



मतिमंद मुलांसह एस.चंद्रा महाविद्यालयातील विद्यार्थिनी व प्राध्यापक.

## विद्यार्थिनींनी घेतली मतिमंद मुलांची भेट

### एस.चंद्रा महाविद्यालयाचा उपक्रम : दिवस घालवून दिल्या भेटवस्तू

लोकमत न्यूज नेटवर्क

आमगाव : येथील एस.चंद्रा महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी मानवता मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत भेट देऊन आपला एक दिवस मतिमंद मुलांसोबत घालविला. या भेटीत त्यांनी मतिमंद मुले व त्यांच्या शिक्षणाबाबत माहिती जाणून घेतली तसेच त्यांना भेटवस्तू दिल्या.

सर्वप्रथम शाळेचे प्राचार्य दिनकर राजाराम माहुरे यांनी मतिमुलांबाबत माहिती दिली. महाविद्यालयाकडून प्राचार्या तृष्णा कळंबे यांच्या हस्ते तसेच सर्व प्राध्यापक व मुलींमार्फत मिठाई व फळांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रा.भावना खापर्डे यांनी बालविकास विषयांतर्गत मतीमंद मुलांना कशाप्रकारे शिक्षण देता येईल व त्यांचा विकास कसा घडविता येणार याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच त्यांना शिकवायला विविध शैक्षणिक साहित्य कसे तयार करता येतील याबाबत माहिती दिली.

या कार्यक्रमाकरिता प्रा.जोगेश्वर कवल, पर्यवेक्षक रोशन बोरकर, राजकुमार यनगंटवार, सुशील खाडे तर महाविद्यालयामधील डॉ. प्रमोद सरदार, प्रा. स्वप्नील भगत, प्रा. देवानंद खोब्रागडे, प्रा. चंदा गायडे, प्रा. दिक्षा वडोले, सीमा चंद्रिकापुरे, दिक्षा रहांगडाले, भाग्यश्री क्षिरसागर तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. यावेळी महाविद्यालयामधील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# Flower Decoration






# जगतिक महिला दिन

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## एस. चंद्रा महिला महाविद्यालय

आमगाव : येथील एस.चंद्रा महिला महाविद्यालयातील गृह विज्ञान विभाग व महिला अध्ययन समिती यांच्या संयुक्तवतीने जागतिक महिला दिन निमित्त विविध उपक्रम साजरा करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी तयार केलेले मास्क बाजारपेठेतील भाजी व्यवसाय करणाऱ्या महिलांना नि:शुल्क वाटप करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील डॉ. चंदा गावंडे व प्रा. दिक्षा बडोले उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी नेहा ठाकरे, पौर्णिमा गायधने, प्रियंका थेर, प्रतिमा भांडारकर, धनश्री पाचे, नेहा शेंडे, यशोदा हेमने, दिपाली टेंभरे, प्रतिमा भिमटे, किरण रामटेके, प्रणाली मेश्राम, पल्लवी रहांगडाले यांनी सहकार्य केले.

# जगतिक महिला दिन



2021-22

# तबांखू मुक्त दिवस




# वृक्षारोपण



# Covid-19 Vaccination




# मेंहदी स्पर्धा







## दांडिया प्रषिक्षण




## विद्यार्थीनीनी तयार केले दिप





लोकमत

# दिवाळीच्या पर्वावर विद्यार्थिनींनी तयार केले दिवे

## एस. चंद्रा. महाविद्यालयाचा उपक्रम : विद्यार्थिनींना प्रशिक्षण

कार्यक्रमात डॉ. तृष्णा कळंबे यांच्यासोबत विद्यार्थिनी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**आमगाव :** स्थानिक एस. चंद्रा महिला महाविद्यालय येथे गृहविज्ञान विभागातील कौटुंबिक संसाधन आणि व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आकर्षक दिवे तयार करण्याच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात बनविलेले दिवे हे प्रदर्शनीच्या माध्यमातून १९ ऑक्टोबर रोजी विक्रीसाठी उपलब्ध करून दिले. यावेळी प्राचार्य तथा कौटुंबिक संसाधन आणि व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. तृष्णा कळंबे उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे यांनी महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता भोयर व आभार अशा भगत यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Hello Gondia
Page No. 3 Oct 24, 2022
Powered by: erelego.com

# बिरसा मुंडा जंयत्ती साजरी



# जागतिक महिला दिन साजरा

देशोन्नती

## महिला दिनानिमित्त विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**आमगाव** ▪ स्थानिक एस. चंद्रा महिला महाविद्यालय आमगाव येथील गृह विज्ञान शाखेअतर्गत कुटुंब संसाधन व व्यवस्थापन विभाग आणि महाविध्यालयाच्या आयक्युएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्य विद्यार्थिनींसाठी मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व फ्लॉवर अरेंजमेंट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविध्यालयाच्या प्राचार्या तसेच कुटुंब संसाधन व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. तृष्णा कळंबे यांनी याप्रसंगी विद्यार्थीनीना मार्गदर्शन करतांना आज महिला या सर्वच क्षेत्रात पुढे असून आपली छाप सोडत आहेत महिलांनी आपल्याला मिळत असलेल्या प्रत्येक संधीचे सोने करावे तसेच महाविध्यालयात महिला दिना निमित्य आयोजित मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व फ्लॉवर अरेंजमेंट स्पर्धा या स्पर्धांचे आयोजना मागे विद्यार्थीनीमधिल सुप्त गुणांनावाव देऊन स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणे असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेत बिजयी विद्यार्थिनीना पारितोषिके देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी मोठ्या संखेत उपस्थित होत्या.

Deshonnati Edition
Mar 9, 2022 Page No. 5

लोकमत

## एस. चंद्रा महिला महाविद्यालय



▪ आमगाव : येथील एस. चंद्रा महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान शाखाअंतर्गत कुटुंब संसाधन व व्यवस्थापन विभाग आणि महाविद्यालयाच्या आयक्यूएसी विभागातर्फे महिला दिनानिमित्त विद्यार्थिनींकरिता मेहंदी, रांगोळी स्पर्धा व फ्लॉवर अ‍ॅरेंजमेंट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या तसेच कुटुंब संसाधन व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. तृष्णा कळंबे यांनी, आज महिला सर्वच क्षेत्रांत पुढे असून आपली छाप पाडत आहेत. महिलांनी आपल्याला मिळत असलेल्या प्रत्येक संधीचे सोने करावे. तसेच महाविद्यालयात महिला दिनानिमित्त आयोजित स्पर्धांच्या आयोजनामागे विद्यार्थिनींमधील सुप्त गुणांना वाव देऊन स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याचे सांगितले. दरम्यान, स्पर्धेत विजयी विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

Hello Gondia
Page No. 3 Mar 09, 2022
Powered by: erelego.com

# जागतिक आरोग्य दिन साजरा

लोकमत

## एस. चंद्रा महिला महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क



**आमगाव :** स्थानिक एस. चंद्रा महिला महाविद्यालयाच्या गृहअर्थशास्त्र विभाग व जीवशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त सुदृढ आरोग्यासंबंधी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तृष्णा कळंबे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बृजबाला बोपचे, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. दीक्षा बडोले, जीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नीतेश मेश्राम उपस्थित होते.

तृष्णा कळंबे यांनी आपल्या मार्गदर्शनात उपस्थितांना मानवी जीवनात आरोग्य हेच खरी संपत्ती असल्याचे सांगत सर्वांनी उत्तम आरोग्य मिळवण्याच्या उद्देश ठेऊन आपल्या दिनचर्येचे नियोजन करावे, असे सांगितले.

डॉ. बृजबाला बोपचे यांनी आपल्या मार्गदर्शनात चांगल्या आरोग्याविषयी जागृती करीत महिलांना आपल्या आरोग्याची विशेष काळजी कशा पद्धतीने घ्यावी, यावर मार्गदर्शन केले.

महिलांमधील रक्तक्षय व टीबी या रोगाबद्दल माहिती व यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर मार्गदर्शन केले. गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. दीक्षा बडोले यांनी प्रास्ताविक मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा शेंडे हिने केले तर प्रणाली मेश्राम हिने आभार मानले.

Hello Gondia
Page No. 3 Apr 08, 2022
Powered by: erelego.com